**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**
**पोलीस उपआयुक्त (गुन्हे)**

---

**प्रेसनोट दि. ०७/१२/२०२१**

**बनावट प्रँक पेमेंट ॲप व वॉलेटच्या साहयाने पिंपरी चिंचवड व पुणे भागातील एकुण २५ सोनारांचे दुकानादारांची फसवणुक करुन सोन्याचे दागीने विकत घेवुन जाणारे इसमास गुंडा विरोधी पथकाने पकडुन त्याचेकडुन किं. रु. ५,७७,६११/- चा मुद्देमाल त्यामध्ये १०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने, मोबाईल, मोपेड गाडी केली हस्तगत**

चिंचवड येथील चंपालाल गुलाबचंद वर्मा ज्वेलर्स, गांधीपेठ चिंचवड, पुणे या दुकानात दि. दि.११/११/२०२१ रोजी १४:४५ वा. ते १६:१९ वा. चे दरम्यान एक इसम सोन्याचे नाणे खरेदी करण्यासाठी आला होता त्यावेळी त्याने ०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नाणे खरेदी करुन त्याचे पेमेंट किं. रु. २३,३५०/- हे त्याने त्याचेकडील मोबाईलमधुन दुकानाचा क्युआर कोड स्कॅन करुन त्याद्वारे त्याचे मोबाईलवर सदर पेमेंट पेड झाल्याचा स्क्रिन शॉट दाखवुन घेवुन गेला होता त्यानंतर दुकानदाराचे असे लक्षात आले की सदरचे पेमेंट जमा झाले नाही त्यामुळे त्याने सदर इसमाने दिलेल्या नंबरवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्याचा फोन हा चुकीचा असल्याचे लक्षात आले त्यामुळे सदर इसमाने फसवणुक केल्याचे दुकानदाराची खात्री झाल्याने त्याने चिंचवड पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने चिंचवड पोलीस गुन्हा रजिस्टर नंबर ३६०/२०२१ भा.द.वि.कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्हयाचा तपास चिंचवड पोलीस स्टेशनमार्फत व वरिष्ठांचे आदेशाने गुन्हे शाखा यांचेकडुन चालु होता.

त्याप्रमाणे गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखेचे अधिकारी सपोनि. एच. व्ही. माने व स्टाफ समांतर तपास करीत असताना त्यांनी दाखल गुन्हयाचे फिर्यादी यांना भेटुन व गुन्हयाचे घटनास्थळी जावुन समक्ष भेट घेवुन आरोपीने केलेल्या दाखल गुन्हयाचे मोडस बाबत सविस्तर माहीती घेतली व दुकानातील सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त करुन सदर माहीती व सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे पिंपरी चिंचवड व पुणे शहर परीसरातील एकुण २७४ ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. ची पहाणी करुन व तांत्रीक विश्लेषणाचे आधारे आरोपीस शोध घेऊन उंड्री, पुणे येथुन त्याने दाखल गुन्हा करताना वापरलेल्या मोपेडसह ताब्यात घेतले. तेव्हा त्याने त्याचे नांव पत्ता **निखील सुधीर जैन, वय २२ वर्षे, सध्या राहणार :- लिटील हार्ट सोसायटी, ए विंग, फलॅट नं. १००४, सिध्दीविनायक मिराजवळ, जगदंबा भवन रोड, उंड्री, पुणे मुळगाव चिंतामणी कृपा, देवगाव रोड बसस्टँड जवळ, भवानीनगर लासुर स्टेशन, पटेल सॉ मिलच्या पुढे, औरंगाबाद** असे असल्याचे सांगितले, त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्याने सदर गुन्हयाची कबुली दिली. आरोपी गुन्हयात निष्पन्न झाल्याने त्यास दाखल गुन्हयात दि.०२/१२/२०२१ रोजी २०.०० वा अटक करण्यात आली आहे.

त्यास मा. न्यायालयात हजर करुन त्यांची दि.०८/१२/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर करुन त्याचेकडे पोलीस कस्टडी रिमांड मध्ये तपास करता त्याने या गुन्हयासह पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील एकुण २५ सोनारांची अशा प्रकारे फसवणुक करुन १०५ ग्रॅम सोन्याचे दागीने घेवुन गेला असल्याचे निष्पन्न झाले आहे **त्याचेकडुन सदर १०५ ग्रॅम सोन्याचे दागीने, गुन्हा करण्यासाठी वापरलेला मोबाईल, मोपेड गाडी असा एकुण ५,७७,६११/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

Scanned with CamScanner

सदर आरोपी याने प्रँक पेमेंट नावाचे ॲप त्याचे मोबाईलमध्ये डाऊनलोड केले होते त्यामध्ये ॲमेझॉन, गुगलपे, फोनपे, पेटीएम इत्यादीसारखे वेगवेगळे बनावट पेमेंट ॲप असुन त्या आधारे क्यु आर कोड स्कॅन केल्यास कोणतेही पेमेंट न जाता ते पेमेंट दुकानदारास पेड झाल्याची व त्याचा ट्रान्झॅक्शन आयडी असलेली स्क्रिन सदर प्रँक पेमेंट ॲपमुळे मोबाईलवर येत असल्याने सदरची मोबाईलवरील पेमेंट पेड झाल्याची स्क्रिन दुकानदारांना दाखवुन तो सोन्याचे दुकानातुन सोन्याचे दागीने फसवणुक करुन खरेदी करुन नेत होता.

आरोपीने अशा प्रकारे खालील सोनारांचे दुकानदारांची फसवणुक केली आहे.

| अ. नं. | ज्वेलर्स दुकानाचे नांव | पत्ता | दिनांक | वजन |
|---|---|---|---|---|
| १ | चंपालाल गुलाबचंद वर्मा ज्वेलर्स, | गांधीपेठ चिंचवड, पुणे | ११/११/२०२१ | ०५.०० ग्रॅम |
| २ | शिल्पा ज्वेलर्स | बिबवेवाडी | ०६/०८/२०२१ | ०.६४० ग्रॅम |
| ३ | भवानी ज्वेलर्स | फुरसुंगी | १०/०८/२०२१ | १.४६० ग्रॅम |
| ४ | निलम ज्वेलर्स | बिबवेवाडी | १२/०८/२०२१ | १.२५० ग्रॅम |
| ५ | महालक्ष्मी ज्वेलर्स | हडपसर | १२/०८/२०२१ | १.००० ग्रॅम |
| ६ | महादेव ज्वेलर्स | हडपसर | १७/०८/२०२१ | १.००० ग्रॅम |
| ७ | पी.एन.जी ज्वेलर्स | उंन्द्री,पुणे | १९/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| ८ | एस.पी. ज्वेलर्स | मार्केट यार्ड,पुणे | १९/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| ९ | न्यु लक्ष्मी ज्वेलर्स | धनकवडी,पुणे | १९/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १० | रांका ज्वेलर्स | कोंढवा,पुणे | २०/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| ११ | रिषभ ज्वेलर्स | वानवडी,पुणे | २०/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १२ | आनंद ज्वेलर्स | भारती विदयापीठ | २०/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १३ | आर चौकसी ज्वेलर्स | बिबवेवाडी | २०/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १४ | सागर ज्वेलर्स | सदाशिव पेठ, पुणे | २४/०८/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १५ | न्यु यशराज ज्वेलर्स | वडगाव बु, पुणे | २५/०८/२०२१ | ५.०१० ग्रॅम |
| १६ | श्री लक्ष्मी ज्वेलर्स | धनकवडी, पुणे | ०३/०९/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १७ | डी.एम.बुडुक ज्वेलर्स | चिचंवड, पुणे | ०४/०९/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १८ | एस.एन.वर्णे ज्वेलर्स | चिचंवड, पुणे | ०४/०९/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| १९ | पवित्र सोनी ज्वेलर्स | हिंजवडी | १५/१०/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| २० | अंबिका ज्वेलर्स | उरलीकांचन, पुणे | २६/१०/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| २१ | जोतीचंद भाईचंद ज्वेलर्स | हडपसर | २६/१०/२०२१ | ५.०६० ग्रॅम |
| २२ | श्री गोल्ड,सिल्व्हर जिम्स ज्वेलर्स | पिंपळे गुरव | २३/१०/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| २३ | दिलीप सोनीगरा ज्वेलर्स | हिंजवडी | ११/११/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| २४ | पुष्कर ज्वेलर्स | कोंढवा, पुणे | १७/११/२०२१ | ५.००० ग्रॅम |
| २५ | सोनीगरा ज्वेलर्स | हडपसर, पुणे | १८/११/२०२१ | ५.००० ग्रॅम |

नागरिकांना/ सोनारांचे दुकानदारांना याद्वारे असे आवाहन करण्यात येत आहे की कोणाची अशा प्रकारे फसवणुक झाली असल्यास त्यांनी गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड येथे संपर्क साधावा व अशा प्रकारे अनोळखी इसमाकडुन पेमेंट आपल्या बँकेत/ वॉलेटमध्ये जमा झाल्याची खात्री झाल्याशिवाय कोणासही आपल्या दुकानातील वस्तुची विक्री करु नये.

सदरची कारवाई ही मा. श्री. कृष्ण प्रकाश सो. पोलीस आयुक्त, मा.डॉ. श्री. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. काकासाहेब डोळे सो. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. प्रशांत अमृतकर सो. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे-१) यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे_सहायक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने, पोलीस अंमलदार - हजरत पठाण, प्रविण तापकिर, सोपान ठोकळ, विक्रम जगदाळे, गंगाराम चव्हाण, गणेश मेदगे, सुनिल चौधरी, , विजय तेलेवार, नितीन गेंगजे, शाम बाबा, रामदास मोहीते, शुभम कदम, ज्ञानेश्वर गिरी, यांनी केली आहे.

( श्री. काकासाहेब डोळे )
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

Scanned with CamScanner